Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.



## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# 1980 नंतरच्या ग्रामीण कवितेचा आविष्कार

*संभाजी मलघे*

इंद्रायणी महाविद्यालय, तळेगांव दाभाडे,

*सारांश :*

1880 नंतरची ग्रामीण कविता पुर्वीच्या कवितेपेक्षा अधिक कृषक वास्तवाची जाणीव करून देणारी कविता आहे. कृषी संस्कृती, कृषी जीवनातील दुःखे, स्त्रीयांचे दुःखे, कारूण्य, श्रमनिष्ठेचे आदिगान, शेतकरी जीवन, लोकरूढी, लोकरीती, शेतीतील प्रश्न सामाजिक व राजकीय परिस्थितीमुळे शेती जीवनाची होणारी कुचंबना, दुष्काळग्रस्त शेतकरी आणि त्यांची स्थिती, शेतकऱ्यांचे होणारे शोषण, बदलती ग्रामव्यवस्था, ग्रामीण माणसांचा होणारा भ्रमनिराश इत्यादी अनेक विषय या कालखंडातील कवितेमधून आलेले आहेत.

*प्रस्तावना :*

या कालखंडात ना. धो. महानोर, आनंद यादव, विठ्ठल वाघ, गजमल माळी, इंद्रजित भालेराव, नारायण कुलकर्णी कवठेकर, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, प्रदीप पाटील, जयराम खेडेकर, कैलास दौंड, प्रकाश किनगावकर आणि संतोष पवार इत्यादी सारख्या कवींचे योगदान महत्त्वपूर्ण असे राहिलेले आहे. सदर लेखामधून या ग्रामीण कवींच्या काव्यलेखनाचा आढावा घेतला आहे.

ना. धो. महानोर

'रानातल्या कविता' (1967), 'वही' (1970) या काव्यसंग्रह लिहून महानोरांनी ग्रामीण कवितेला उच्चस्थान दाखविले. त्यानंतरच्या त्यांच्या 'पावसाळी कविता' (1980), 'अजिंठा' (1984), 'प्रार्थना दयाघना' (1990), 'पानझड' (1997), 'पक्षांचे थवे' (1990) या काव्यसंग्रहांनी ग्रामीण कवितेत मानबिंदू उमटविले. या संग्रहांमधून ते शेती, माती, पाणी, गुरेढोरे आणि 'रान' यांच्याशी मुक्तपणे बोलले. त्यांच्या कवितेमुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण माणूस शेतीसह, निसर्गासह दिसून आला. महानोरांनी निसर्गाचे देणे 'देणं' मानले. शेतकऱ्यांच्या संदर्भातील अनेक बाबी, समस्या, महानोरांना स्वतः माहिती होत्या. कारण ते स्वतः आयुश्यभर खेडयात राहिले. खेडयांचे ओसांडी दुःख आणि शेतकऱ्याच्या समस्या व्यक्त करणारा 'दयाघन' म्हणजे महानोर. ग्रामीण भावविश्वाची कड आणि दुःखाचे कढ गिळकृत करणारा राष्ट्रीय जाणीवेचा कवी म्हणून महानोरांच्या काव्याशी कृतार्थ होता येईल.

आनंद यादव

तसे यादव हे नाव ग्रामीण कवितेत घेतले जाते ते आनंदानेच. परंतु तसे ते काही खऱ्या अर्थाने ग्रामीण कवी नव्हे. 'मायलेकरं' (1989) या काव्यसंग्रहातून ग्रामीण भागातील माय आणि उच्च विद्याविभूषित लेकरु असे भावविश्व टिपले आहे–

*''आला आला सोना माझा*
*हयो ग वाटेवरी बघं*
*भुकेवेल्या धरतीपायी धावं*
*पावसाळी घं''ग*

असे यादव या संग्रहातून म्हणतात. गेयता, कृषी जीवनातील दुःख, मजूर श्रमिकांची व्यथा, वेदना मांडतांना यादव नक्कीच 'कृषीअधिकारी' वाटतात. शेतकऱ्यांचे विशेषतः शेतकऱ्यांच्या मुलांना दुःख वाटयाला येऊ नये असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. 'मायलेकरं' मधून ग्रामीण भागातील मायलेकरं हे नाते व ऋणानुबंध यादवांनी टिपले आहेत.

'मळयाची माती' (1978) लिहिणारे यादव मात्र मातीनिष्ठ वाटतात. शेती जीवनाचे अनुभव शेतकऱ्यांच्या बोलीतून प्रकट करुन मराठी ग्रामीण कवितेला नव्हे तर मराठी साहित्यालाच त्यांनी ग्रामीण बोलीचे नवे रुप दाखविले साहित्यात ग्रामीण भाशा यादवांच्या लेखनामधूनच पहिल्यांदा आली.

DSpace™

***''कसं आहे हे हिरवं जग***
***किती दिसतंय गुलजार***
***मैत्रा तुझ्या समाधानापायी***
***लाबणंच बघ''***

पाढरं रान, काळी ठिक्कर ढेकळं, मातीत गेलो तरी माती हे धन असतयं या जाणिवा यादवाच्या कृषीनिष्ठ आहेत. यादवांनी या दोन संग्रहांनंतर मात्र पुढे ग्रामीण कविता का लिहिली नाही हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

विठ्ठल वाघ

वाघ नावाचा 'विठ्ठल' ग्रामीण कवितेतून साकारला तो पहिल्यांदाच. वऱ्हाडी बोलीचे अतिव लेणे लेवून विठ्ठल वाघांची कविता धरणीला नवे सत्व देते. 'काया मातीत मातीत' (1991), 'वैदर्भी', 'साय', 'कपाशीची चंद्रफुले' (1999), 'पंढरीच्या वाटेवर' (2001), 'वृशभसूक्त' (2003) हे काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. 'काया मातीत मातीत तिफन चालते' या कवितेमुळे लोकमान्य पावलेले व ग्रामीण माणसाच्या अंतकरणात पोहचलेले विठ्ठल वाघ दिसून येतात.

***''पऱ्हाटीच्या नख्खीतून आला कापूस फुलून***
***पाची बोटांवर किस्न लोनी राहे झेलून''***

या ओळींमधून कृषी जीवनाचे अनेक संदर्भ उलगडतात.

***''कसा झाला हा मानुस कळुनिंबाचा रे पाला***
***येल काकडीचा होता बार कारल्याचा आला''***

मानवी मूल्यांचे आणि कृषी जीवनाचे अत्यंत वास्तव दर्शन विठ्ठल वाघांची कविता घडविते. असे म्हणता येईल–

वारंकरी संस्कृती, कृषी जीवनाची नाळ, त्या जीवनातील दुःखाची ओली भळभळ, वृशभसूक्ते आणि वैदर्भी बोलीचा साज यामुळे विठ्ठल वाघांची कविता ग्रामीण कवितेत मोठी भर लावतांना दिसते.

गजमल माळी

शेतकरी कुटुंबाच्या हालापेश्टांचे चित्रण व्यक्त करणारी माळींची कविता निवेदनातून साकारते. 'नागफणा व सूर्य' (1979) हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झालेला आहे.

***''मला नाही भेटली***
***माझ्या बापाची ही असहाय तीव्र वेदना***
***मराठी कवितेच्या वाहत्या प्रवाहातून***
***मला नाही भेटलं आईचं दुःख संबंध सारस्वताच्या बागांतून***
***मला नाही भेटलं कोणीही रानात राबणारं***
***नाही फिरवलेत आपले मखमली हात***
***या मराठी कवितेनं***
***वाळलेल्या रक्तहीन देहावरून''***

शेतकरी जीवनाचे दाहक वास्तव माळी यांनी या काव्यसंग्रहामधून मांडलेले आहेत. परंतु पुन्हा तोच प्रश्न पडतो की, या काव्यसंग्रहानंतर माळींची काव्यप्रतिभा का थांबली?

इंद्रजित भालेराव

लोकतत्त्वीय अनुभूतींना तत्कालीन संदर्भांशी जोडणारा या कालखंडातील महत्त्वाचा कवी म्हणून भालेरावांच्या कवितेकडे आशेने पाहावे लागेल. मिथके, बोलीरूपे, ग्रामीण लयी, छंद, ओवी, अभंग इत्यादींचा वापर करुन ग्रामीण भावविश्व भालेरावांनी मांडले आहे. 'पीकपाणी' (1989), 'आम्ही काबाडे धनी' (1992), 'दूर राहिला गाव' (1994), 'कुळंबिनीची कहाणी' (1998), 'पेरा' (2002), 'टाहो' (2004) इत्यादी काव्यसंग्रह लिहून भालेरावांनी 1980 नंतरच्या ग्रामीण कवितेला पुन्हा एकदा महानोरांसारखे मानाचे स्थान प्राप्त करून दिले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकरी संघटना, चळवळ, शेतीचे तीव्र होणारे प्रश्न, शेतकऱ्यांसाठी नसलेली हुकमी बाजारपेठ, हमीभाव, जागतिकीकरण, आणि कृशी जीवनाचे अनेक बदलते संदर्भ भालेरावांच्या कवितेमधून आलेले दिसतात. पीकपाणी काव्यसंग्रहामधील एक कविता उदा. म्हणून लक्षात घेता येईल.

***''काया काया षेतामधी। काय काय जे घडलं***
***पाखराच्या बोलीसह। तुला माहीत पडलं***
***तुला माणुसकी ठावं। तुला माणसाची हाव***
***गाणं तुहं नित घेई। माझया हिरिताचा ठाव''***

किंवा 'आम्ही काबाडाचे धनी' या काव्यसंग्रहातील एक कविता अशी–

"काल चढवून भव कोनं उतरीला आज
कोन राबतं शेतात करतंया राज"

तर 'पेरा' काव्यसंग्रहामध्ये भालेराव म्हणतात–

*"लाजरेपणा बुजरेपणा बाजारात ईक*
*घेवू नको फाशी बाबा खावू नको ईख*
*मागं मागं नको पुढं सरायला षीक*
*आत्महत्या नको हत्या करायला षीक*

भालेरावांची कविता शेतकरी व त्यांचे भावविश्व यांच्याशी अतुट नाते सांगणारी कविता आहे. त्यांच्या कवितेने शेतकरी व कृषी जीवनातील अनेक प्रश्न, समस्या मांडल्या ज्या समाजाचा ग्रामीण माणूस 'कणा' आहे त्या माणसाचे होणारे शोषण व त्यांचे उद्वस्त होणारे भावविश्व याचे अत्यंत तलस्पर्शी व वास्तव टिपणारी भालेरावांची कविता ग्रामीण कवितेच्या इतिहासात महत्त्वाची ठरावी.

नारायण कुलकर्णी कवठेकर

'मागील पानावरून पुढे' (1997) हा काव्यसंग्रह नावातच वेगळेपणा घेऊन प्रसिद्ध झाला. अपेक्षेप्रमाणे मागील कवींच्या सारखी परंतु बोथट वेदना सोडून बदलते ग्रामीण संवेदन कवठेकरांनी टिपले. उपरोधिक व उपाहासात्मक भाश्य करणे हा कवठेकरांचा पिंड. या काव्यसंग्रहामधून उपरोधिकपणे पण कटू सत्य मांडले आहे. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही, राजकीय, सामाजिक, नेतृत्वांकडून शेतकऱ्यांची हेळसांड होते, शोशण होते यावर प्रकाश टाकणारी कवठेकरांची कविता आहे.

*"गायरानात*
*हाडकि गुरं उभी राहतात*
*ईळंनमाळ*
*गायरानात गवत नाही*
*न गायीच्या पोटात माया*
*गायी हागतही नाहीत*
*अन ढोरकी पोरं उदास होतात*
*षेणाच्या टोपल्यांची*
*भकास उघडी तोंड पाहून"*

या व्यवस्थेत शेतकऱ्याच्या नशिबी आगतिकता, दुःख हे ठरलेलेच आहे अशी ही कविता सूचित करते. आणखी एका कवितेत कवठेकर सांगतात–

*"आपल्याच विहिरीत*
*जीव नको देऊ*
*अशी व्यवस्था वरतीच*
*ठरली आहे बाबा*
*की पाणी पाणी म्हणत तू*
*उन्हात डोळे पांढरे करषील तरीही ना मरषील*
*तर धो धो पडेल पाऊस पुरात वाहून जाषील"*

अशी ग्रामीण वास्तवाचा दाहक प्रत्यय देणारी कवठेकरावांची कविता आहे.

प्रकाश होळकर

'कोरडे नक्षत्र' (1997) हा काव्यसंग्रह होळकरांचा प्रसिद्ध आहे. पावसाची अतुरतेने वाट पाहणारा शेतकरी होळकरांच्या कवितेमधून चित्रित झाला आहे. शेतीतील ओल हरवली आहे. दुष्काळ पडला आहे. व्यथांच्या गर्तेत शेतकरी अडकला आहे असे होळकरांच्या या काव्यसंग्रहामधून प्रश्न आलेले आहेत.

श्रीकांत देशमुख

1997 साली 'बळीवंत' हा काव्यसंग्रह देशमुखांचा प्रसिद्ध झाला. भालेरावांप्रमाणे लोकबोली, लोकसंकेत, अभंग, ओवी या छंदांचा वापर करून शेतकरी जीवनातील दबलेले नैराश्य देशमुखांनी कवितेमधून व्यक्त केले. विविध पातळीवर होणारे शेतकऱ्यांच्या शोषणाचा वेद घेणारी त्यांची कविता आहे–

*"हाती दगडाचे*
*धरोनीया टाळ*
*उभारावा मेळ*
*निशेधाचा"*

किंवा

***''कुणब्याचे सत्व***
***मातीत सांडले***
***झाडही सुकले***
***जोतिबाचे''***

देशमुखांच्या 'आशाढ माती', 'गाव झाल एकादशी' यासारख्या अनेक कविता उल्लेखनिय आहेत.

याशिवाय जगदीश देवपुरकर याचा 'गावाकडच्या कविता' (1981), रमेश चिल्ले 'नांगरून पडलेलं शतक' (2002), कैलास दौंड यांच्या 'ऊसाच्या कविता', 'वसाण', प्रदीप पाटील यांच्या 'आत्मसंवाद' आणि 'अंतरीचा भेद', जयराम खेडेकर 'ऋतुवंत' (1997), पद्माकर पवार, प्रकाश किनगावकर इत्यादी कवीनी केलेले काव्यलेखन ग्रामीण कवितेत मोलाचे ठरले आहे.

***समारोप***

मराठी ग्रामीण कवितेचे स्वरूप लक्षात घेता असे दिसते की, 1980 नंतर ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख इत्यादींसारखे महत्त्वाचे कवी काव्यलेखन करताना दिसतात. या कवींमुळे 1980 नंतरची ग्रामीण कविता विस्तारली. ग्रामीण भागातील विविध प्रश्न, बदलते ग्रामीण भावजीवन, ग्रामीण माणसाचे दैन, दुःख, दारिद्रय इत्यादींचा वेध घेणारी ग्रामीण कविता मराठी साहित्यात मोलाची ठरावी.

***संदर्भ***

1.जाधव रा. ग., देशपांडे वि. भा., 'मराठी वाङमयाचा इतिहास', मराठी साहित्य परिषद, खंड सातवा, भाग 2, पृश्ठ 493
2.कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, 1985
3.यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
4.यादव आनंद, 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
5.नलगे चंद्रकुमार, 'ग्रामीण साहित्याचा इतिहास'

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net